क्र. निशि/मागणी/२०१७/का.क्र.२/तूरडाळ/जा.क्र. ८२२
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
E mail : dycor.ho-mum@gov.in

दिनांक - ०६/१२/२०१७

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये
२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

**विषय :- राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांना रास्तभाव दुकानांमार्फत स्वस्त दराने तूरडळ विक्री करणेबाबत...**

**संदर्भ :-** १. शासनपत्र क्र.अधापु-२०१६/प्र.क्र.१८५/ना.पु.२२, दि.३०.११.२०१७
२. शासन निर्णय क्र.सपस-२०१७/प्र.क्र.१९८/२४-स, दि.२८.११.२०१७

राज्य शासनामार्फत बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीची भरडाई केल्यानंतर, तूरडाळीची विक्री राज्यातील स्वस्त धान्य दुकानातून करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून, सदर तूरडाळीची विक्री सर्व शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाची आहे.

सदर तुरडाळीची सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांवर, कार्डधारकांच्या मागणीप्रमाणे आणि सध्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजनेतील व प्राधान्य कुटुंबांच्या लाभार्थ्यांतील सर्व शिधापत्रिकांना PoS machine द्वारे नोंदणी करुन तूरडाळीची विक्री करण्यात येईल. सदर तूरडाळीची विक्री रु.५५/- प्रति किलो या दराने करावयाची आहे.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी शासनाकडून ९७२ मे.टन तूरडाळीचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर परिमंडळनिहाय शिधापत्रिकांनुसार तूरडाळीचे परिमंडळनिहाय नियतन खालीलप्रमाणे आहे.

## तूरडाळीचे परिमंडळनिहाय मंजूर नियतन

| अ. क्र. | परि मंडळ | शिधापत्रिका | | | | | १००% आवश्यकता (मे.टन) | मंजूर तूरडाळ नियतन (मे.टन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अंत्योदय (AAY) | प्राधान्य कुटुंब (PHH) | एपीएल (NPH) | शुभ्र | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | अ | १७७८ | १८०८१६ | २०८७४८ | १४३४३२ | ५३४७७४ | ५३४.७७४ | १२५.००० |
| २ | ड | ४९० | २२७३३४ | १६६२०४ | ११९५२८ | ५१३५५६ | ५१३.५५६ | १२०.००० |
| ३ | ई | ३१६१ | ५११९५१ | २९१८११ | १५४७८३ | ९६०९०६ | ९६०.९०६ | २२५.००० |
| ४ | ग | २०१४ | २६३२५८ | २३०८६६ | १५८३५४ | ६५४४९२ | ६५४.४९२ | १५३.००० |
| ५ | फ | १३७५४ | ६९२४९८ | ४७६१४१ | ३०९३६० | १४९१७५३ | १४९१.७५३ | ३४९.००० |
| एकूण | | २११९७ | १८७५०५७ | १३७३७७० | ८८५४५७ | ४१५५४८१ | ४१५५.४८१ | ९७२.००० |

सदर तूरडाळीच्या वितरणाची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे.

१) अधिकृत शिधावाटप दुकानातून सर्व शिधापत्रिकाधारकांना तूरडाळीची विक्री करावी

२) सदर तूरडाळ मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्राकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत यांच्या सानापडा, नवी मुंबई येथील गोदामात पुरविण्यात येईल.

३) उपरोक्त गोदामामध्ये पुरवठा करावयाच्या तूरडाळीचे प्रमाण याबाबतची माहिती जिल्हा मार्केटिंग अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत यांना पाठविण्यात यावी.

४) जिल्हा मार्केटिंग अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत यांचेकडून परिमंडळ कार्यालयांच्या मागणीप्रमाणे १ किलोच्या पाकिटातील तूरडाळींच्या २५ पाकिटांची १ बॅग तयार करुन विहित केलेल्या ठिकाणी (सानापडा, नवी मुंबई) पोहोच करण्यात येईल.

५) तूरडाळ विहित ठिकाणी (सानापडा, नवी मुंबई) प्राप्त होताना त्या ठिकाणच्या नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत, मुंबई यांचे प्रतिनिधी यांनी प्राप्त झालेली तूरडाळ, दर्जा व मागणीनुसार प्राप्त झाली असल्याबाबत एकत्रीत तपासणी करावी व त्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत यांना सादर करावयाची आहे.

६) सदर तूरडाळीची विक्री रु.५५/- प्रति किलो या दराने करावयाची आहे. सदर तूरडाळीच्या विक्रीपोटी अधिकृत शिधावाटप दुकानदारास PoS मशिनद्वारे होणाऱ्या व्यवहारानुसार वितरित होणाऱ्या तूरडाळीस रु.१.५० प्रतिकिलो व PoS मशिन व्यतिरिक्त वाटप होणाऱ्या तूरडाळीस रु.०.७० प्रतिकिलो एवढे मार्जिन दिले जाणार आहे. त्यामुळे त्यांनी मागणी केलेल्या तूरडाळीच्या प्रमाणानुसार प्राप्त होणाऱ्या तूरडाळीची रक्कम ती प्राप्त होण्यापूर्वी रु. ५०/- प्रति किलो या दराने दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई यांच्या नावे Indian Bank, Br. Mandvi, Masjid Bunder, Mumbai (IFSC CODE :- IDBI000M013) या बँकेतील 786959948 या खाते क्रमांकावर NEFT, RTGS द्वारे अथवा रोखीने जमा करावयाची आहे.

७) उप नियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये यांनी सदर तूरडाळीची विक्री रु.५५/- प्रति किलो या दराने केल्यानंतर, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत, मुंबई यांचेकडे जमा करण्यात येणारी रक्कम रु.५०/- प्रतिकिलो + रास्तभाव धान्य दुकानदारांचे मार्जिन वजा करुन उर्वरीत रक्कम वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांच्या स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये जमा करावयाची आहे. तसेच, शासकीय गोदामापर्यंत पोहोचविलेली तूरडाळ, उचल करण्यात आलेली तूरडाळ याबाबतची माहिती SIMNIC वर दररोज अद्ययावत करावयाची आहे.

सदर तूरडाळीच्या नियतनानुसार तूरडाळीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत, मुंबई यांचेकडे जमा केलेली रक्कम व तूरडाळीची गोदामातील आवक तसेच, उचल, वाटप व शिल्लकीबाबतचा progressive अहवाल दररोज या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(दिलीप शिंदे)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा, मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि सा.बां.वि., मंत्रालय, मुंबई.

२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )

३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )

४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका(संबंधीत परिमंडळामार्फत)

५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी. मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळामार्फत)

६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )

७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई

९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई

१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

११. रेशनिंग कृती समिती, आर.एच.४,सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.

१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.

१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घन:श्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८

१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-५१.

१५. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, नवीन बीडीडी चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव, मुं. १४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या.,कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.

२. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई.

३. उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा) परेल, मुंबई.

४. उप संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुं-२१

५. सहाय्यक नियंत्रक शिधावाटप, (दक्षता शाखा).

६. सर्व संघटित संस्था/ वाहतूक कंत्राटदार, परिमंडळ कार्यालयामार्फत.

७. कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रशासन शाखा व नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.